**प्रेस नोट** **दि.२०/०३/२०१९**

## मुंढवा पोलीस स्टेशन

## महिला पोलीसांनी लहान मुलींना बॅड टच,गुड टच बाबत केले मार्गदर्शन

दि.१९/०३/२०१९ रोजी मुंढवा पोलीस स्टेशन कडील महिला पोलीस उप निरीक्षक नरके, महिला पोलीस हवालदार भारती होले व महिला पोलीस शिपाई नांगरे यांनी सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे या ठिकाणी असलेल्या एकात्मीक बालविकास प्रकल्प या संस्थेमध्ये शिबीर आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास एकुण ३५ मुली, संस्थेचे अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरीक हे उपस्थित होते. महिला पोलीस कर्मचारी यांनी लहान मुलींना शेजारी, नातेवाईक यांचेकडून होणाया छळवणूकीबाबत तसेच बॅड टच, गुट टच याबाबत मार्गदर्शन करुन व स्वतः लहानग्यामध्ये मिळून मिसळून उत्कृष्टरित्या प्रात्यक्षीक देवून समजावून सांगितले व लहान मुलींच्या समस्यांचे निरसन केले.

वर नमूद पोलीसांनी केलेल्या कार्याबद्दल व लहान मुलांना उत्कृष्टरित्या मार्गदर्शन करुन समजावून सांगितल्याने संस्थेचे अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरीकांनी ही त्यांचे आभार माणले व यापुढेही असेच मार्गदर्शन केल्यास भविष्यामध्ये घडणाया अनैतिक घटनांना आळा बसले याबाबत मत व्यक्त केले.

